Nehru Yuva Krida & Sanskrutik Mandal, Chikhli's

**Late. Bhaskarrao Shingane Arts, Prof. Narayanrao Gawande Science & Ashalata Gawande Commerce College**

Lavala Road, Sakharkherda. Tq. Sindkhed Raja, Dist. Buldana (M.S.) - 443202

NYKSM
• विद्याधनं सर्वधनंप्रधानम् । •

Prof. N. S. Gawande
Secretary

Dr. N. N. Gawande
Principal

College Code No. 336 Contact No. 9822364082 Fax : 07264-266211 Email - lbsac336@sgbau.ac.in

Ref. No. Date :

**Photograph of Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens.**



Student & Staff performing the Yoga's different exercise



Students & Staff present on the occasion of Independence day celebration



Save girls child campaign




August Kranti Din Celebration



**Principal Dr. N. N. Gawande, Teaching & Non teaching staff and students on the occasion of Independence Day**




A tribute to Major Dhyanchand on his birth Anniversary

On the occasion of National Sports Day Students participated in various activities




Celebration of Gandhi Jayanti




Preamble recitation by teachers on constitution day



Celebration of Yoga Day



Participation of students in running competition



Preamble recitation by teachers



Celebration of Republic Day



Tree Plantation on occasion of Independence Day

Late Bhaskarrao Shingane Arts, Prof. Narayanrao Gawande Sci. & Ashalata Gawande Commerce College
Sakharkherda
Dist. Buldana
(M.S.)

PRINCIPAL
Late Bhaskarrao Shingane Arts,
Prof. Narayanrao Gawande Science &
Ashalata Gawande Commerce College,
Sakharkherda Tq. S. Raja Dist. Buldana

# गावंडे महाविद्यालयात राष्ट्रीय एकात्मता दिन

◆ चिखली : स्व.भास्करराव शिंगणे कला, प्रा.नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय साखरखेर्डा येथे प्राचार्य डॉ. बाळासाहेब गावंडे यांच्या मार्गदर्शनात सरदार वल्लभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकात्मता दिन म्हणून उत्साहात साजरी



करण्यात आली. इंग्रजी विभागातर्फे आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.परमेश्वर गायकवाड होते. तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.प्रशांत महल्ले. याप्रसंगी बोलताना डॉ. गायकवाड यांनी सरदार वल्लभाई पटेल यांनी एकसंघ भारताच्या निर्मितीसाठी संस्थाने विलीनीकरण करताना घेतलेली कणखर भूमिका खऱ्या अर्थाने त्यांना लोहपुरुष सिद्ध करणारी असल्याचे सांगीतले. प्रास्ताविक प्रा.प्रवीण शिंबरे, सूत्रसंचालन प्रा.सागर गवई तर आभार प्रा. कुलकर्णी यांनी मानले. (तालुका प्रतिनिधी)

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



**प्रति./साखरखेर्डा :** येथील स्व.भास्करराव शिंगणे कला, प्रा.नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. बाळासाहेब गावंडे यांच्या मार्गदर्शनात महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतिहास विभाग प्रमुख डॉ.रवींद्र झनकेहोते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ.गायकवाड व मराठी विभाग प्रमुख प्रा. काकडे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.शिंबरे उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना डॉ. झनके यांनी आंबेडकरी तत्वज्ञान हे प्रत्येक माणसाला सर्वार्थाने प्रतिष्ठा देणारे सर्वस्पर्शी तत्वज्ञान आहे. त्यामुळे देशातील सर्वच शोषित, पीडित व वंचित घटकांनी बाबासाहेबाना समजून घेऊन त्यांना स्वीकारण्याची व त्यांचे विचार अंगिकरण्याची गरज आहे अश्या शब्दात त्यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा गौरव केला. प्रमुख अतिथी डॉ. परमेश्वर गायकवाड यांनी सामाजिक न्यायचे तत्व स्वीकारून ते रुजविण्यासाठी कार्य करणाऱ्या विश्वरत्न डॉ. आंबेडकरांनी सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. या दृष्टीने डॉ.आंबेडकर मानवी हक्काच्या युद्धाचे नेतृत्व करणारे नेते ठरतात असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सागर गवई यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.पोपळघट यांनी केले तर आभार प्रा. कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# सा.खेर्डा गावंडे वाणिज्य महाविद्यालयाचा 'शुभम' तलवारबाजीत विद्यापीठ संघामधे



साखरखेर्डा,दि.१६(प्रतिनीधी):- स्थानिक स्व.भास्करराव शिंगणे कला, प्रा.नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी शुभम सुरडकरची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठद्वारा आयोजित आंतरमहाविद्यालयीन तलवारबाजी स्पर्धेत यश प्राप्त केल्यामुळे विद्यापीठ संघात निवड झाली. सदर स्पर्धा दिनांक ३ डिसें ते ५ डिसें. दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अमरावती येथे आयोजित करण्यात आली होती. त्यात ५८ महाविद्यालयातून १८० खेळाडूंनी भाग घेतला होता त्यामध्ये महाविद्यालयाचा बी. एस्सी. भाग एक चा विद्यार्थी शुभम बळीराम सुरडकर याने तलवारबाजीच्या ईप्पी या प्रकारात विजय मिळवून विद्यापीठ संघात स्थान मिळविले आहे . आपल्या यशाचे श्रेय त्याने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.निलेश गावंडे आणि बुलडाणा तलवारबाजी संघटनेचे सचिव सत्यनारायन लोढे तसेच महाविद्यालयाचे संचालक शारीरिक शिक्षण ए. जी. बरडे यांना दिले.आंतरविद्यापीठ स्पर्धा हया ८ जानेवारी ते ११ जानेवारी दरम्यान अमृतसर येथील गुरुनानक देव विद्यापीठामध्ये पार पडणार आहे. शुभमने प्राप्त केलेल्या यशाबद्दल त्याचे कौतुक होत आहे.

सावगर यांना गाडगेबाबांना देव  हातात दगड घेऊन त्यांनी कीर्तन  आयुष्यभर समाजप्रबोधनाचे

## गाडगेबाबांचे कीर्तन व कार्य दिपस्तंभासारखे मार्गदर्शक : डॉ. प्रशांत महल्ले

**प्रति./साखरखेर्डा :** अज्ञान अंधश्रद्धा व अस्वच्छता यांनी बुरसटलेल्या समाजाला प्रत्यक्ष कृतीतून व कीर्तनातून बहुजन समाजाच्या विकासासाठी धडपडणाऱ्या गाडगेबाबांचे कार्य समाजासाठी दिपस्तंभासारखे मार्गदर्शक असल्याचे मत डॉ प्रशांत महल्ले यांनी व्यक्त केले. ते स्व.भास्करराव शिंगणे कला , प्रा.नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. बाळासाहेब गावंडे यांच्या मार्गदर्शनात गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन पर कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख डॉ. झनकेउपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून ग्रंथपाल प्रा. प्रकाश कोल्हे व डॉ. किटकेउपस्थित होते .पुढे डॉ.महल्ले यांनी गाडगेबाबांच्या कार्यावर


**पाहिजेत**

दवाखान्यामध्ये काम करण्यासाठी १ कंपाऊंडर आणि कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत.

■ प्रत्यक्ष येवून भेटावे.

संपर्क • डॉ.राहूल राजपूत

**सिध्दीकृपा बाल रूग्णालय**

ठिकाण : श्री शिवाजी उद्यानसमोर, खंडाळा रोड, चिखली




प्रकाश टाकताना दिवसा गावातील घाण स्वच्छ करणे व रात्री लोकांच्या मनात दडलेली अज्ञान व अंधश्रद्धा स्वच्छ करणारे गाडगेबाबा हे खऱ्या अर्थाने आधुनिक समाजसुधारक होते असे म्हणून त्यांनी गाडगे बाबांची दशसूत्री ही आधुनिक समाजाचा जाहीरनामा ठरते असे मत व्यक्त केले. डॉ. झनकेयांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना समाजातील अनिष्ट चालीरीती व अंधश्रद्धा पाहून लोकसेवेचे व्रत स्वीकारलेल्या गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनातून स्वच्छता प्रामाणिकपणा व भूतदया यावर विशेष भर दिला त्यामुळे त्यांचे विचार समाजासाठी प्रेरक असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सागर गवई यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.चैतन्य ददगाळे यांनी केले तर आभार डॉ. निलेश ताले यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## भारतीय महिला मुक्तीच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले : डॉ. श्याम दुतोंडे


**प्रति./साखरखेर्डा :** अज्ञान अंधश्रद्धा व परंपरा यांनी बुरसटलेल्या समाजात समग्र स्त्री जातीच्या उत्थानासाठी हयातभर धडपडणाऱ्या सावित्रीबाईंचे कार्य समाजासाठी उपकारक असल्याचे मत डॉ. श्याम दुतोंडे यांनी व्यक्त केले. ते स्व.भास्करराव शिंगणे कला , प्रा.नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ.बाळासाहेब गावंडे यांच्या मार्गदर्शनात सावित्रीबाई फुले जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख डॉ. झनके उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून ग्रंथपाल प्रा. प्रकाश कोल्हे व प्रा. पोपळघट उपस्थित होते .पुढे डॉ. दुतोंडे यांनी सावित्रीबाईंच्या कार्यावर प्रकाश टाकताना सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्वाचे साहित्यिक, समाजसुधारक, स्त्रीशिक्षणाच्या



प्रणेत्या, सत्यशोधक असे कितितरी पैलू असून त्यांच्या एकंदरीत कार्यातून त्या भारतीय महिला मुक्तीच्या प्रणेत्या ठरतात असे मत व्यक्त केले. डॉ. झनकेयांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना समाजातील अनिष्ट चालीरीती व अंधश्रद्धा पाहून व्यथित झालेल्या सावित्रीबाईंनी आपल्या अष्टपैलू कार्यातून स्त्रीयांनी शिकावे, अनाथांना आश्रय मिळवा यावर विशेष भर दिला. त्यामुळे त्यांचे कार्य समाजासाठी प्रेरक असून यादृष्टीने त्या क्रांतिज्योती ठरतात असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सागर गवई यांनी केले. सूत्रसंचालन कुमारी पडघान हिने केले तर आभार ऋत्विक बोबडे याने मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी

# साखरखेर्डा येथे आंतरराष्ट्रीय योगदिन

**साखरखेर्डा, ता.२२ :** येथील स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ . नीलेश गावंडे यांच्या मार्गदर्शनात आंतरराष्ट्रीय योगा दिन उत्साहात पार पडला . दरवर्षी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. आरोग्य रक्षणार्थ सर्वांनीच योगाकडे वळावे या हेतूने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांना योगाचे धडे देण्यात आले. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीलेश गावंडे यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमध्ये आपले शारीरिक व मानसिक आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी योग महत्त्वपूर्ण भूमीका अदा करतो.



**साखरखेर्डा : योगाभ्यास करताना प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी.**

त्यामुळे व्यस्त जीवन शैलीतसुद्धा योग करणे काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून योगाभ्यास केला.

विदर्भ दर्पण

# स्व.भास्करराव शिंगणे महाविद्यालयाचे शुटींग बॉल स्पर्धेत सुयश

**प्रति./साखरखेर्डा :** स्थानिक स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र व जिल्हा क्रीडा कार्यालय औरंगाबाद व राज्य शुटिंग बॉल असो. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय राज्यस्तरीय शुटींग बॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केला. दि ८ ते १० डिसेंबरे दरम्यान धनाबाई दीपचंद टेक्निकल हायस्कूल कचनेर येथे



ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. दरम्यान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निलेश गावंडे यांनी सर्व विजेत्या खेळाडूचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच परिसरातील जनसामान्यांकडूनही विजेत्या खेळाडूंचे कौतुक होत आहे. यापूर्वी विभागीय स्तरावर या संघाने प्रथम क्रमांक प्राप्त करत राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश केला होता.

## तरुणांनी जाज्वल्य देशप्रेमाची ज्योत अखंड तेवत ठेवावी : प्राचार्य डॉ.गावंडे



**प्रति./चिखली :** एकविसाव्या शतकात देशाची एकता व अखंडता अबाधित ठेवण्याचे आव्हान तरुणांना पेलायचे असून त्यासाठी सर्वांनी आपल्या हृदयात जाज्वल देशप्रेमाची ज्योत अखंडपणे तेवत ठेवने गरजेचे आहे असे मत प्राचार्य डॉ.निलेश गावंडे यांनी व्यक्त केले.

दि.२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त स्व.भास्करराव शिंगणे कला, प्रा.नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय साखरखेर्डा येथे आयोजित बक्षीस वितरण समारंभात अध्यक्ष म्हणून बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी देशात देशविघातक शक्ती जोर धरत असून त्यामुळे भारताची धर्मनिरपेक्षता धोक्यात येत असल्यामुळे देशविकासासाठी तरुणांनी इरुायल्ली नागरिकांप्रमाणे देशभक्ती हृदयात जोपासने गरजेचे आहे. लोकशाही प्रजासत्ताक संविधानातून नागरिकांना मूलभूत हक्क बहाल करून देणा-या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा उल्लेख करून त्यांनी भारतीय नागरिकांना स्वतंत्र प्रदान करण्यासाठी बलिदान दिलेल्या शहिदांचे कार्य स्मरणात ठेऊन स्वच्छ व समृद्ध भारताचे स्वप्न आपण साकार करावे असे आवाहन केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून गावंडे कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य श्री.पवार उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. गावंडे यांच्या हस्ते झेंडा वंदन पार पडले. उपस्थितांनी राष्ट्रगीतातून तिरंगा व देशाप्रति सन्मान व्यक्त केला. यावेळी पाली विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या पाली स्पर्धा परीक्षेत अनुक्रमे कु.प्रीती मिलिंद गवई प्रथम, कु.मेघा दिवाकर गवई व कु.साधना आश्रु गवई सयुंक्तपणे द्वितीय व कु.शिवानी संतोष खंडारे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. खाशाबा जाधव राज्यस्तरीय ज्युनिअर कुश्ती स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन प्राविण्य प्राप्त केल्याबद्दल त्यांचे प्रमाणपत्र देऊन कौतुक करण्यात आले. राज्यस्तरीय शुटिंग बॉल स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थांनी तृतीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल त्यांचाही प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. राज्यस्तरीय उत्कर्ष स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केल्याबद्दल विजय गवई याचाही सन्मान करण्यात आला . संचालन प्रा.काकडे यांनी तर आभार डॉ. दुतोंडे यांनी मानले. यावेळी शारीरिक शिक्षण संचालक प्रा. बरडे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.


**● महत्वाचे ●**

**शॉप ॲक्ट (Shopact) आणि अन्न व औषधी (FDA) चे लायसन्स नवीन तसेच रिनीवल करून मिळेल.**

**कागदपत्रे :** १. आधार कार्ड २. असेसमेंट ३. २ फोटो ४. दुकानाचा फोटो

संपर्क : **अनिल कॉम्प्युटर्स,** कोठारी हॉस्पीटलच्या मागे,